डी. पी. भोसले कॉलेज ग्रंथालय कोरेगाव

सातारा, सोमवार, २४ जून २०१९

सकाळ

# सहा महाविद्यालयांत नवीन अभ्यासक्रम सुरू

## साताऱ्यातील चार व कऱ्हाड आणि कोरेगावातील प्रत्येकी एक महाविद्यालय

**मान्यता मिळालेली महाविद्यालये**

- यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्स, सातारा
- लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्स, सातारा
- धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालय, सातारा
- इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेज, सातारा
- सद्‍गुरू गाडगे महाराज महाविद्यालय, कऱ्हाड
- डी. पी. भोसले कॉलेज, कोरेगाव

**कऱ्हाड, ता. २३ :** जिल्ह्यातील सातारा, कऱ्हाड व कोरेगावमधील सहा महाविद्यालयांमध्ये शासनाकडून नव्याने १९ अभ्यासक्रम विषयांना मान्यता मिळाली आहे. यावर्षीपासून संबंधित महाविद्यालयांमध्ये हे अभ्यासक्रम सुरू केले जाणार असून त्याच्या प्रवेश प्रक्रियेची कार्यवाही सुरू आहे. दरम्यान, नव्याने मान्यता मिळालेल्यामध्ये साताऱ्यामध्ये इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉलेजमध्ये एलएलएमला मान्यता मिळण्याबरोबरच यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये बी.एस्सी.साठी एनसीसीला (ऐच्छिक) मान्यता मिळाली.

शासनाच्या उच्च व तंत्रशिक्षण विभागाने नुकतेच राज्यातील महाविद्यालयांमध्ये नवीन अभ्यासक्रम, विषयांना मान्यता दिली. त्याचा आदेशही नुकताच झाला. त्यात शिवाजी विद्यापीठातील १९ महाविद्यालयांना नवीन अभ्यासक्रम, विषयांना मान्यता मिळाली. २०१९-२० या शैक्षणिक वर्षापासून हे अभ्यासक्रम संबंधित महाविद्यालयांत सुरू करण्यात येत आहेत. त्यातील कऱ्हाडातील सद्‍गुरू गाडगे महाराज महाविद्यालयात मान्यता मिळालेल्या दोन विषयांसाठी प्रवेश प्रक्रियेस सुरवात झाल्याचे महाविद्यालयाने कळवले आहे. त्यात साताऱ्यातील चार महाविद्यालयांचा, तर कऱ्हाड व कोरेगावमधील प्रत्येकी एका महविद्यालयाचा समावेश आहे. साताऱ्याच्या यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये बी.एस्सी.साठी ऐच्छिक एनसीसीलाही मान्यता मिळाली आहे.

लाल बहादूर शास्त्री कॉलेज ऑफ आर्टस, सायन्स ॲण्ड कॉमर्समध्ये एम.कॉम.च्या पहिल्या वर्षासाठी ॲडव्हान्स अकौंटन्सी विषयास, यशवंतराव चव्हाण इन्स्टिट्यूट ऑफ सायन्समध्ये एम.एस्सी.च्या पहिल्या वर्षासाठी फिजिकल, केमिस्ट्री, ॲनॅलिटिकल केमिस्ट्री, इनऑरगॅनिक केमिस्ट्री तसेच बी.एस्सी.च्या पहिल्या वर्षासाठी एनसीसीची सोय उपलब्ध झाली आहे. धनंजयराव गाडगीळ वाणिज्य महाविद्यालयात एम.कॉम.च्या पहिल्या वर्षासाठी बॅंक मॅनेजमेंट विषयास मान्यता मिळाली. त्याशिवाय इस्माईलसाहेब मुल्ला लॉ कॉजेजमध्ये एलएलएमची सोय उपलब्ध झाली असून डिप्लोमा इन सायबर तसेच डिप्लोमा इन टॅक्सेशन या अभ्यासक्रमांना मंजुरी मिळाली आहे.

कोरेगाव येथील डी. पी. भोसले कॉलेजमध्ये एम.एस्सी. भाग एकच्या ॲनॅलिटिकल केमिस्ट्री विषयास तसेच एम.कॉम.च्या पहिल्या वर्षासाठी ॲडव्हान्स पान ४ वर »